# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मुंबई अग्निशमन दलाच्या आस्थापनेवरील रु.21700- 69100 अधिक अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीतील “अग्निशामक” या संवर्गातील सद्या रिक्त असलेली व संभाव्य रिक्त पदे सरळसेवेने (वॉक इन सिलेक्शन) पध्दतीने भरावयाची आहेत.

| एकूण पदे | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 910 | 99 | 26 | 18 | 14 | 22 | 16 | 08 | 173 | 91 | 443 |

वरील अनुशेषावर खालीलप्रमाणे समांतर आरक्षण असेल.

| अ.क्र. | समांतर /इतर आरक्षण | जात प्रवर्ग | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
| 1 | माजी सैनिक | 15 | 04 | 03 | 02 | 03 | 02 | 01 | 26 | 14 | 66 | 136 |
| 2 | खेळाडू | 05 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | - | 09 | 05 | 22 | 46 |
| 3 | प्रकल्पग्रस्त | 05 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | - | 09 | 05 | 22 | 46 |
| 4 | भूकंपग्रस्त | 02 | 01 | - | - | - | - | - | 03 | 02 | 09 | 17 |
| 5 | महिला | 30 | 08 | 05 | 04 | 07 | 05 | 02 | 52 | 27 | 133 | 273 |
| 6 | सर्वसाधारण आरक्षण | 42 | 11 | 08 | 06 | 10 | 07 | 05 | 74 | 38 | 191 | 392 |
| 7 | एकूण | 99 | 26 | 18 | 14 | 22 | 16 | 08 | 173 | 91 | 443 | 910 |
| 8 | अनाथ | 09 पदे | | | | | | | | | | |
| 9 | दिव्यांग | 37 पदे (दिव्यांग आरक्षण लागू होणार नाही असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे त्यासापेक्ष.) | | | | | | | | | | |

टिप - उपरोक्त संवर्गातील अनुशेषांतर्गत पदांमध्ये माजी सैनिकांसाठी 15 टक्के, खेळाडूसाठी 5 टक्के, मुंबई महानगरपालिकेच्या प्रकल्प अंतर्गत बाधित 5 टक्के, भूकंपग्रस्त 2 टक्के, महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ही पदे शासन निर्देश संदर्भित करुन त्यातील अटीनुसार भरण्यात येतील.

अनाथांसाठी 1 टक्के आरक्षण प्रमाणे एकूण उपलब्ध रिक्त पदांनुसार 09 पदे आरक्षित होत आहेत. सदर पदे शासन निर्णय क्र.अनाथ-2018/प्र.क्र.182/का-03 दि.23.08.2021 संदर्भित करुन भरण्यात येतील. भरती अंतर्गत पात्र अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास खुला प्रवर्गातील (सर्वसाधारण) एकूण रिक्त पदांमधून 09 पदे रिक्त ठेवण्यात येतील.

शासन निर्णय क्र. दिव्यांग 2018/प्र.क्र.114/16अ दि.29.5.2019 नुसार शारिरीकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी 4% आरक्षण विहित करणे व आरक्षण अंमलबजावणी करण्याचे निर्देश आहेत. त्याप्रमाणे भरती वर्ष दि.01.01.2022 ते दि.31.12.2022 हया कालावधीत मुंबई अग्निशमन दलाच्या गट 'ड' मधील सर्व संवर्गातील एकूण 932 रिक्त पदांवर 4% प्रमाणे 37 पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित होत आहेत. तथापि, मुंबई अग्निशमन दल हे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्यामुळे सर्व पदांच्या निकषानुसार उमेदवार/कर्मचारी हा शारीरीक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. यास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मुंबई अग्निशमन दलातील प्रत्यक्ष कार्यवाहीवरील

सरळसेवा/पदोन्नतीने भरण्यात येणा-या पदांना शारिरीकदृष्टया दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षण लागू होणार नाही असा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आलेला आहे. तद्अनुषंगाने शासनाच्या प्राप्त होणा-या मंजूरीसापेक्ष व उक्त शासन निर्णयातील निदेशानुसार 'अग्निशामक' संवर्गातील खुला प्रवर्गातील (सर्वसाधारण) एकूण रिक्त पदांमधून 37 पदे दिव्यांग व्यक्तीसाठी रिक्त ठेवण्यात येतील.

**अर्हता-**

| | |
|---|---|
| 1. | उमेदवार मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची कला, विज्ञान, किंवा वाणिज्य शाखेतील इयत्ता 12 वी किमान 50 टक्के गुणांसह प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण असावा.<br>माजी सैनिकांसाठी -<br>उपरोक्त अर्हता धारण केलेली असावी .<br>किंवा<br>उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता 10 वी ) उत्तीर्ण असावा व त्याच्याकडे भारतीय सेनेत किमान 15 वर्षे सेवा केल्याबाबत पदवी प्रमाणपत्र असावे. |
| 2. | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| 3. | वैदयकीय दर्जा – उमेदवार शारीरिक आणि मानसिकदृष्टया सदृढ असावा. सर्व प्रकारच्या संसर्गजन्य रोगांपासून मुक्त असावा. |
| 4. | उमेदवाराकडे खालील नमूद केलेला किमान शारिरीक दर्जा असणे आवश्यक आहे.<br>उंची-किमान 172 से.मी. (पुरुषांसाठी)<br>उंची-किमान 162 से.मी. (महिलांसाठी)<br>छाती-81 से.मी. (साधारण), 86 से.मी. (फूगवून) (महिलांसाठी छातीची अट लागू नाही)<br>वजन- किमान 50 कि.ग्रॅ.<br>दृष्टी- चष्मा किंवा तत्सम साधनांशिवाय नेहमीची (सामान्य), वर्णान्धता: आजारापासून मुक्त असावा. |
| 5. | वयोमर्यादा- उमेदवारांचे वय दि.31.12.2022 रोजी 20 वर्षापेक्षा कमी व 25 वर्षापेक्षा जास्त नसावे. परंतु कोविड-19 सार्वत्रिक साथरोगामुळे भरती प्रक्रीया राबविण्यात आलेली नसल्यामुळे फक्त या भरती प्रक्रीयेकरिता एक वेळची उपाययोजना म्हणून उमेदवारांचे वय दि.31.12.2022 रोजी 20 वर्षापेक्षा कमी व 27 वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवार, युध्दात मृत्यू पावलेल्या सैनिकांच्या कुटुंबनिवृत्ती वेतनावर अवलंबून असलेले उमेदवार, माजी सैनिक व महानगरपालिका कर्मचा-यांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा 05 वर्षांनी शिथिल करण्यात येईल. खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत 05 वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल. माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्षे इतकी राहील. शासन निर्णयानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल घटक प्रवर्ग व अनाथ आरक्षणामधून अर्ज करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा 05 वर्षांनी शिथिल करण्यात येईल. |
| 6. | जड वाहन चालविण्याचा वैध परवाना असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. |
| 7. | महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणा-या व्यवसाय/शारिरीक चाचणीत उमेदवार उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, अशाच उमेदवारांचा त्यांच्या गुणवत्तेनुसार निवडीकरिता विचार करण्यात येईल. |
| 8. | उमेदवार 'डि.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीचे 'सी.सी.सी.'किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जी.ई.सी.टी.' चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा महाराष्ट्र शासन या संदर्भात वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल अशी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, अर्ज सादर करताना सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नसल्यास निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत शासनाने विहित केलेली 'एम.एस.सी.आय.टी.' ची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |

**उमेदवारांनी टक्केवारीनुसार भरतीसाठी हजर राहावयाचे ठिकाण-**

लोकनेते गोपीनाथ मुंडे शक्ती मैदान (भावदेवी मैदान), जे.बी.सी.एन. शाळेच्या बाजूला, विनी गार्डन सोसायटी समोर, मंडपेश्वर, दहिसर (पश्चिम), मुंबई-400103.

**उमेदवारांनी टक्केवारीनुसार भरतीसाठी हजर राहावयाचे वेळापत्रक-**

| अ.क्र. | जात प्रवर्ग/समांतर आरक्षण/अनाथ आरक्षण | | 12 वी परिक्षेची गुणांची टक्केवारी | वैयक्तिक माहितीपत्र भरुन, डिमांड ड्राफ्ट व मुळप्रमाणपत्रासह भरतीसाठी हजर राहावयाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | **विमाप्र** | (समांतर आरक्षणातील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 50% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.13.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 2 | **भज ब** | (समांतर आरक्षणातील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 50% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.14.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 3 | **भज क** | (समांतर आरक्षणातील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 50% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.16.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 4 | **भज ड** | (समांतर आरक्षणतील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 50% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.17.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 5 | **अ.जा.** | (समांतर आरक्षणातील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 60% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.18.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 6 | | | उपरोक्त परिक्षेत 50% ते 59.99% गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.19.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 7 | **अ.ज.** | (समांतर आरक्षणातील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 50% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.20.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 8 | **आदुघ** | (समांतर आरक्षणातील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 50% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.21.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | **इमाव** | (समांतर आरक्षणातील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 65% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.23.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 10 | | | उपरोक्त परिक्षेत 55% ते 64.99% गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.24.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 11 | | | उपरोक्त परिक्षेत 50% ते 54.99% गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.27.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 12 | **माजी सैनिक/ अनाथ** | अजा, अज, विजाअ, भजब, भजक, भजड, विमाप्र, इमाव, आदुध, खुला या प्रवर्गातील सर्व उमेदवार | उपरोक्त परिक्षेत 50% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार किंवा उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता 10 वी ) उत्तीर्ण व भारतीय सेनेत किमान 15 वर्षे सेवा केल्याबाबत पदवी प्रमाणपत्र. | दि.28.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 13 | **खुला** | (समांतर आरक्षणातील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 70% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.30.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 14 | | | उपरोक्त परिक्षेत 60% ते 69.99% गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.31.01.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 15 | | | उपरोक्त परिक्षेत 55% ते 59.99% गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.01.02.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 16 | | | उपरोक्त परिक्षेत 50% ते 54.99% गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.02.02.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 17 | **विजा अ** | (समांतर आरक्षणातील खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांसहीत) | उपरोक्त परिक्षेत 50% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.03.02.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |
| 18 | **महिला** | अजा, अज, विजाअ, भजब, भजक, भजड, विमाप्र, इमाव, आदुध, खुला या प्रवर्गातील सर्व उमेदवार (समांतर आरक्षणासहीत) | उपरोक्त परिक्षेत 50% किंवा अधिक टक्के गुण प्राप्त केलेले उमेदवार | दि.04.02.2023 सकाळी 08.00 वाजेपर्यंत |

**(टिप- उमेदवारांना टक्केवारीनुसार ज्या दिनांकाला बोलविण्यात आलेले आहे त्याच दिनांकाला भरती प्रक्रीयेसाठी हजर राहणे आवश्यक आहे. इतर दिवशी हजर राहिल्यास त्याला भरतीप्रक्रीयेकरिता सहभागी होता येणार नाही. तसेच सकाळी 08.00 नंतर आलेल्या उमेदवारांना भरतीप्रक्रीयेच्या ठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही.)**

**<u>निवडीचे निकष व कार्यपध्दती-</u>**

1. इयत्ता 12 वी प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.
2. भरती प्रक्रीयेतील मैदानी व प्रमाणपत्र चाचणी (व्यावसायिक चाचणी) यामध्ये प्राप्त झालेले गुण अशा एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्तेनुसार सामाजिक/समांतर आरक्षण विचारात घेऊन निवड/गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. तथापि, दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास जन्मदिनांकानुसार वयोजेष्ठतेने प्राधान्यक्रम देण्यात येईल व जन्म दिनांक समान असल्यास उमेदवाराच्या नावाचे अद्याक्षर (इंग्रजी) याप्रमाणे प्राधान्यक्रम देण्यात येईल.

3. उच्च गुणवत्ताधारक मागासप्रवर्गाच्या उमेदवारांची खुला पदांवर नेमणूक करण्यात येईल.

4. निवड झालेल्या उमेदवारांमधून रिक्त असलेल्या पदांच्या उपलब्धतेनुसार अग्निशमन शल्य चिकित्सक यांच्याकडे वैदयकीय तपासणीस पाठविण्यात येईल. वैदयकीय तपासणीत पात्र झालेल्या उमेदवारांना मुंबई अग्निशमन दलाच्या प्रशिक्षण केंद्रावर, मुंबई अग्निशमन दलाच्या पाठयक्रमानुसार 6 महिन्यांचे प्रशिक्षण प्रशिक्षणाच्या नियमावलीनुसार देण्यात येईल. प्रशिक्षणादरम्यान अग्निशामक उमेदवारास दरमहा रु. 3000/- (रुपये तीन हजार फक्त) इतके पाठयवेतन देण्यात येईल.बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची सदर पदासाठी निवड झाल्यास तो ज्या खात्यात कार्यरत होता त्या खात्यामार्फत प्रशिक्षण कालावधीसाठी त्याचे वेतन काढण्यात येईल.

5. प्रशिक्षण कालावधीमध्ये तीन चाचणी परिक्षा व अंतिम मैदानी व लेखी परिक्षा घेण्यात येईल. एकत्रित सर्व परिक्षा मिळून सरासरी 50 टक्के गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अनुत्तीर्ण झाल्यास शेवटची संधी म्हणून प्रशिक्षण कालावधी तीन महिन्यांपर्यंत वाढविण्यात येईल व वाढीव प्रशिक्षण कालावधीत घेण्यात येणा-या एक चाचणी व अंतिम लेखी व मैदानी परिक्षेत एकत्रित 50 टक्के गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व पुन्हा संधी दिली जाणार नाही. प्रशिक्षण वाढविण्यात आलेल्या उमेदवाराला त्याच्या वाढीव प्रशिक्षण कालावधीत कोणतेही पाठयवेतन देण्यात येणार नाही व त्यांना वाढीव प्रशिक्षण विनापाठयवेतन करावे लागेल.

6. भरतीच्या निवडीच्या वेळची गुणवत्ता/निवड यादीत प्राप्त केलेले गुण 50 टक्के व प्रशिक्षण कालावधीत प्राप्त केलेले गुण 50 टक्के (गुणांची बेरीज करुन) यासह सेवाज्येष्ठता तयार करुन उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल. तसेच त्यांचे आरक्षण भरतीच्या गुणवत्ता यादीतील आरक्षणानुसारच राहील.

7. शारिरीक मानके, शैक्षणिक अर्हतांचे निकष व भरती प्रक्रियेतील विविध चाचण्या पूर्ण करणा-या उमेदवारांचीच (पात्र उमेदवारांची) कार्यालयीन नोंद ठेवण्यात येईल व भरती प्रक्रियेत अपात्र ठरणा-या उमेदवारांची कोणत्याही प्रकारची नोंद ठेवण्यात येणार नाही.

8. अग्निशामक पदाच्या भरती प्रक्रीयेत पात्र होण्यासाठी मैदानी चाचणीत किमान 50 टक्के गुण (म्हणजेच 120 गुणांपैकी किमान 60 गुण)प्राप्त करणे आवश्यक आहे. मैदानी चाचणीत 50 टक्क्यांपेक्षा कमी गुण प्राप्त करणारे उमेदवार भरतीसाठी अपात्र होतील.

9. भरतीच्या ठिकाणी महानगरपालिका वैद्यकीय परिक्षकांनी प्रमाणित केलेली उंची, वजन, छाती याबाबत कोणत्याही उमेदवाराला प्रशासनाकडे अपील करण्याचा अधिकार असणार नाही.

10. उमेदवारांना निवडीच्या वेळी खालीप्रमाणे व्यावसायिक चाचणी दयावी लागेल.

**पुरुष/महिला उमेदवारांची 200 गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.**

| | | |
|---|---|---|
| 1. | मैदानी चाचणी | 120 गुण |
| 2. | प्रमाणपत्र चाचणी | 80 गुण |
| | | -------------- |
| | | एकुण 200 गुण |

**1. शारीरिक पात्रता-**

| शारीरिक पात्रता – पुरुष | शारीरिक पात्रता – महिला |
|---|---|
| अ) उंची – किमान 172 सें.मी.<br>आ) छाती – 81 सें.मी. (साधारण) 86 सें.मी.(फुगवून)<br>इ) वजन – किमान 50 कि.ग्रॅम | अ) उंची – किमान 162 सें.मी.<br>आ) वजन – किमान 50 कि.ग्रॅम |

**2. मैदानी चाचणी – पुरुष उमेदवारांसाठी**

अ) 3 मिनीटांमध्ये 800 मीटर्स अंतर धावणारे उमेदवार पुढील चाचणीस पात्र होतील.

ब) 19 फुट उंचीवरुन जंपिंग शिटमध्ये उडी न मारणारे उमेदवार अपात्र होतील.

क) जमिनीपासुन 33 फूट उंचीवरील खिडकीस लावलेल्या (46.4' वरील उंचीच्या) ॲल्युमिनियम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरावे लागेल.

(आरंभ रेषेपासून शिडी 20 फूट अंतरावर असेल.) **(40 गुण)**

| वेळ (सेकंदांमध्ये ) | गुण |
|---|---|
| 20 सेकंद किंवा 20 सेकंदापेक्षा कमी | 40 गुण |
| 20.1 सेकंद ते 30 सेकंदांपर्यंत | 25 गुण |
| 30.1 सेकंद ते 40 सेकंदांपर्यंत | 10 गुण |
| 40 सेकंदापेक्षा जास्त | शून्य गुण |

ड) 50 कि.ग्रॅम वजनाची मानवाकृती खांदयावर घेऊन दिलेल्या मार्गाने 60 मीटर अंतर धावणे. **(40 गुण)**

| वेळ (सेकंदांमध्ये ) | गुण |
|---|---|
| 20 सेकंद किंवा 20 सेकंदापेक्षा कमी | 40 गुण |
| 20.1 सेकंद ते 30 सेकंदांपर्यंत | 20 गुण |
| 30.1 सेकंद ते 40 सेकंदांपर्यंत | 10 गुण |
| 40 सेकंदापेक्षा जास्त | शून्य गुण |

इ) 20 फुट उंचीपर्यंत रस्सीवर चढणे व उतरणे (रस्सीवर चढतेवेळी फक्त हाताचा वापर करणे बंधनकारक राहील. पायाचा वापर करता येणार नाही केल्यास शून्य गुण मिळेल) सदर रस्सी पुर्ण चढल्यास 30 गुण, ¾ चढल्यास 20 गुण, ½ चढल्यास 10 गुण तसेच अर्ध्यापेक्षा कमी अंतर चढल्यास शून्य गुण दिले जातील. **(30 गुण)**

ई) 20 पुल अप्स काढणे. **(10 गुण)**

(प्रत्येक पुल-अप्सला अर्धा गुण याप्रमाणे 20 पुल अप्स पूर्ण केल्यास 10 गुण देण्यात येतील.)

**3. मैदानी चाचणी – महिला उमेदवारांसाठी**

अ) 4 मिनीटांमध्ये 800 मीटर्स अंतर धावणारी उमेदवार पुढील चाचणीस पात्र होतील.

ब) 19 फुट उंचीवरुन जंपिंग शिटमध्ये उडी न मारणारी उमेदवार अपात्र होतील.

क) जमिनीपासुन 33 फूट उंचीवरील खिडकीस लावलेल्या (46.4' वरील उंचीच्या) ॲल्युमिनियम एक्सटेन्शन शिडीवर खिडकीपर्यंत वर चढून त्याच शिडीने खाली उतरावे लागेल.

(आरंभ रेषेपासून शिडी 20 फूट अंतरावर असेल.) **(40 गुण)**

| वेळ (सेकंदांमध्ये ) | गुण |
|---|---|
| 30 सेकंद किंवा 30 सेकंदांपेक्षा पेक्षा कमी | 40 गुण |
| 30.1 सेकंद ते 40 सेकंदांपर्यंत | 30 गुण |
| 40.1 सेकंद ते 50 सेकंदांपर्यंत | 20 गुण |
| 50.1 सेकंद ते 60 सेकंदांपर्यंत | 10 गुण |
| 60 सेंकदांपेक्षा जास्त | शून्य गुण |

ड) 40 कि.ग्रॅम वजनाची मानवाकृती खांदयावर घेऊन दिलेल्या मार्गाने 60 मीटर अंतर धावणे. **(40 गुण)**

| वेळ (सेकंदांमध्ये ) | गुण |
|---|---|
| 25 सेकंद किंवा 25 सेकंदांपेक्षा कमी | 40 गुण |

| | |
|---|---|
| 25.1 सेकंद ते 35 सेकंदांपर्यंत | 20 गुण |
| 35.1 सेकंद ते 45 सेकंदांपर्यंत | 10 गुण |
| 45 सेकंदापेक्षा जास्त | शून्य गुण |

इ) गोळा फेक (4 कि.ग्रॅ.) **(10 गुण)**

| अंतर | गुण |
|---|---|
| 6 मीटर व त्यापेक्षा जास्त | 10 गुण |
| 5 मीटर ते 6 मीटरपेक्षा कमी | 07 गुण |
| 4 मीटर ते 5 मीटरपेक्षा कमी | 04 गुण |
| 4 मीटर पेक्षा कमी | शून्य गुण |

ई) लांब उडी **(15 गुण)**

| अंतर | गुण |
|---|---|
| 15 फूट व त्यापेक्षा जास्त | 15 गुण |
| 12 फूट ते 15 फूटापेक्षा कमी | 10 गुण |
| 9 फूट ते 12 फूटापेक्षा कमी | 05 गुण |
| 9 फूटापेक्षा कमी | शून्य गुण |

फ) पुश अप (जोर काढणे) **(15 गुण)**

(प्रत्येक पुश-अपला एक गुण याप्रमाणे 15 पुश अप पूर्ण केल्यास 15 गुण देण्यात येतील.)

**टिप-** पुरुष व महिला उमेदवारांना वरील मैदानी चाचणी करतांना कोणत्याही टप्प्यावर दुखापत झाल्यास ही सर्व जबाबदारी संबंधित उमेदवाराची असेल. सदर उमेदवार मैदानी चाचणीच्या त्याच टप्प्यावर अपात्र करण्यात येतील. त्यांना कोणतीही पुन्हा संधी दिली जाणार नाही व ते महानगरपालिकेकडे कोणताही दावा करु शकणार नाही यांची नोंद घ्यावी.

**4. प्रमाणपत्र चाचणी (पुरुष व महिला)**

अ) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर व राज्य शासनाचे महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी व राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांच्या कडील अग्निशामक, **(25 गुण)**
दुय्यम अधिकारी व तत्सम मान्यताप्राप्त अभ्यासक्रम प्रमाणपत्रधारकास
(अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम 10 गुण, दुय्यम अधिकारी पाठयक्रम व तत्सम प्रमाणपत्रधारकास 15 गुण, देण्यात येतील)

ब) एन.सी.सी.चे प्रमाणपत्र **(20 गुण)**
'सी' प्रमाणपत्र – 10 गुण, 'ब' प्रमाणपत्र – 06 गुण,
'अ' प्रमाणपत्र – 04 गुण किंवा शालेय पातळीवरील M.C.C. प्रमाणपत्र

क) 1. अर्ज सादर करण्याच्या दिनांकाला हलके वाहन चालविण्याचा वैध परवाना (Light Motor Vehicle Licence) असल्यास- **(05 गुण)**
2. अर्ज सादर करण्याच्या दिनांकाला जडवाहन चालक वैध परवाना असल्यास- **(05 गुण)**

ड) 1) नागरी सेवादलाच्या अग्निशमन अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र 06 गुण **(10 गुण)**
2) होमगार्डमध्ये कमीत कमी 03 वर्षे सेवा केल्याचे प्रमाणपत्र 04 गुण

इ) सरकारी / निमसरकारी संस्था यांच्याकडे समुद्रकिना-यावर जीवरक्षक म्हणून 01 वर्षे सेवा केलेली

असल्यास किंवा मुंबई अग्निशमन दलात कंत्राटी जीवरक्षक म्हणून किमान सहा महिने सेवा असल्यास – **(15 गुण)**

**<u>सर्वसाधारण अटी -</u>**

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणुका करण्यात येतील. तथापि, गुणवत्ता/निवड यादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना आहेत. जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर कोणत्याही व्यक्ती / संस्था यांच्याकडून प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार केला जाणार नाही अथवा पत्रोत्तर दिले जाणार नाही.
2. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.
3. वैयक्तिक माहितीपत्र विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण वैयक्तिक माहितीपत्र विचारात घेतले जाणार नाहीत.
4. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे समोरुन काढलेले छायाचित्राच्या चार अतिरिक्त प्रती भरतीच्या दिवशी व पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.
5. वैयक्तिक माहितीपत्रासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणा-या) ए – 4 आकारातील असावे.
6. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखादया कर्मचा-याला भरतीसाठी हजर रहावयाचे असेल तर त्याने त्याच्या खातेप्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
7. उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्र व्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट (पिन कोड सहीत ) व पुर्ण असावा.
8. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरीता विचार केला जाणार नाही.
9. भरतीसाठी उपस्थित राहण्यापूर्वी उमेदवारांनी पदाच्या अर्हता व अटी पुर्ण करीत असल्याची खातरजमा करावी. उमेदवार विहित अर्हता व अटी पुर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणुक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.
10. उमेदवाराने जन्मदाखला/जन्म तारखेचा पुरावा, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र, व्यावसायिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र, क्रिडा व इतर प्रमाणपत्र, चालक परवाना, संबंधित गुणपत्रिका, सक्षम अधिका-यांनी दिलेली जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र यांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या छायांकित प्रतीसह भरतीसाठी उपस्थित रहावे. माजी सैनिक असल्यास सक्षम प्राधिका-यांकडून विमुक्ती प्रमाणपत्र आवश्यक आहे. विवाहित महिलांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे किंवा त्यांच्या लग्नापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
11. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यांत शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे. निवडीनंतर त्याबाबत माहिती झाल्यास त्याला/तिला सेवेतून कमी करण्यात येईल.
12. निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापुर्वी सदर पदाच्या 1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे(आशयाचे) हमीपत्र सादर करावे लागेल. उमेदवाराने प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर अग्निशामक म्हणून मुंबई अग्निशमन दलामध्ये किमान 5 वर्षे सेवा करणे बंधनकारक राहील. त्यापुर्वी नोकरी सोडल्यास 1 महिन्याच्या वेतनाएवढी रक्कम व

प्रशिक्षणासाठी झालेला खर्च रु.480/- प्रती दिन याप्रमाणे महानगरपालिकेकडे भरपाई करावी लागेल असे लेखी हमीपत्र रु. 100/- कोर्ट स्टॅम्प कागदावर दयावे लागेल.

13. उमेदवारास वॉक इन सिलेक्शनच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. तसेच उमेदवारांनी जेवणाची व खाण्याची व्यवस्था स्वत: करावी.
14. उमेदवाराची वाणी शुध्द असावी, तोतरेपणा नसावा.
15. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही अग्निशमन केंद्रात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा मुंबई महानगरपालिकेच्या कोणत्याही अग्निशमन केंद्रात बदली योग्य असेल.
16. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणत्याही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
17. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित साक्षांकित प्रत उमेदवारांनी वैयक्तिक माहितीपत्रासोबत जोडावी.
18. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्ती नंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 आणि बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम 2015 आणि शिस्त याबाबत महानगरपालिकेने तयार केलेले नियम व अटी/शर्ती यामध्ये वेळोवेळी होणा-या सुधारणासह लागू होतील. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम 1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.
19. सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.
20. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.
21. अ.जा. आणि अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास व आदुघ प्रवर्गातील उमेदवार तसेच खुला वर्गातील महिला उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नविनतम प्रमाणपत्र (चालू आर्थिक वर्षाचे) भरतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.
22. परिपत्रक क्र.एमबीसी/7100 दि.31.01.2012 मधील शासन निदेशानुसार निवड झालेल्या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. नियुक्तीनंतर उमेदवाराने एक महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राशी संबंधित जात पडताळणी समितीकडे दावा सादर करुन त्याबाबतची पोच पावती संबंधित नियुक्ती प्राधिका-यास सादर करणे आवश्यक आहे. जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.
23. भरतीकरिता उपस्थित असलेल्या कोणत्याही उमेदवाराला स्वत:जवळ भ्रमणध्वनी बाळगण्यास सक्त मनाई आहे. भ्रमणध्वनी आढळल्यास त्यास भरती प्रक्रीयेतून अपात्र ठरविण्यात येईल.
24. भरती प्रक्रीयेच्या वेळी उमेदवारांचे पालक/नातेवाईक यांना भरती प्रक्रीयेच्या ठिकाणी उपस्थित राहण्यास सक्त मनाई आहे.

25. शारीरिक चाचणीस येताना उमेदवाराने कोणतेही उत्तेजक/मादक द्रव्य (Dope) सेवन करु नये. उत्तेजक/मादक द्रव्य (Dope) सेवन केलेले आढळल्यास त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.
26. शारीरिक चाचणीच्या दिनांकात/ वेळेत बदल करण्याची उमेदवाराची कोणतीही विनंती स्विकाराई असणार नाही.
27. शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या पुरुष उमेदवारास मैदानी परिक्षेसाठी हाफ पॅन्ट व बनियन परिधान करणे आवश्यक राहील व महिला उमेदवारास मैदानी परिक्षेसाठी गोल गळयाचा टी शर्ट व फुल ट्रॅक पॅन्ट परिधान करणे आवश्यक आहे.
28. मैदानी चाचणीमध्ये इजा होऊ नये म्हणून उमेदवाराने कॅनव्हासचे शूज/स्पोर्टस् शूजचा वापर करावा.
29. व्यावसायिक चाचणी दरम्यान उमेदवारास मार लागल्यास अथवा जीवघेणी दुखापत झाल्यास ती त्या उमेदवाराची जबाबदारी राहील. त्याबाबत नुकसान भरपाई दिली जाणार नाही. तसेच सदर निवड चाचणी कोणत्याही टप्प्यावर पूर्ण करु न शकल्यास त्या उमेदवारास पुढील चाचणीमध्ये कोणतेही गुण दिले जाणार नाही व त्यास त्याच टप्प्यावर अपात्र करण्यात येईल.
30. सरळसेवा भरती अंतर्गत अग्निशामक या संवर्गाकरिता समांतर आरक्षणांतर्गत महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवार घेण्यात येतील.
31. मुंबई अग्निशमन दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासणीसाठी प्रशिक्षण कालावधीमध्ये देण्यात येणा-या वेगवेगळया प्रशिक्षण पध्दतीत अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.
32. खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी शासन निर्णय क्र. राक्रीधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2 दि.01.07.2016 व तदंनतर सुधारित निर्णयानुसार गट 'ड' साठी क्रीडा विषयक विहित अर्हता धारण केल्याचे प्रमाणपत्र विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेले असावे. ते प्रमाणपत्र विधीग्राहय नसल्याचे निर्दशनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
33. स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे नाम निदेर्शित शासन निर्देशानुसार उपलब्ध झाल्यास त्यांचा विचार प्राधान्याने करण्यात येईल.
34. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.
35. खुल्या वर्गातील महिला व अन्य समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निर्देशानुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र, चालू आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.
36. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महानगरपालिका निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवास स्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
37. शासन निर्णय क्र. अनाथ-2018/प्र.क्र.182/का-03 दि.23.08.2021 अन्वये दिलेल्या निर्देशनुसार अनाथ आरक्षणाबाबत अटी व शर्ती विचारात घेऊन सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
38. महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ दि.12.02.2019 आणि क्र.राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ दि.31.05.2021 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रवर्गातील पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

39. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.
40. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अंक-1010/717/प्र.क्र.322/10/16-अ दि.26.08.2010 अन्वये, एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारास समांतर आरक्षणाचा पुन्हा लाभ देता येणार नाही.
41. प्रकल्पग्रस्तांसाठी सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.11 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम 1999 नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.10 दि.03.04.2008 अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्वे यानुसार नगरबाहय विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.
42. उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिका सोडून इतर शासकीय/निमशासकीय खात्यात कार्यरत असल्यास त्याने नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
43. शासन अधिसूचना दि.28.03.2005 व त्या अनुषंगाने शासन परिपत्रक दि.01.07.2005 लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

**विशेष सूचना -**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
2. जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याने किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
3. मध्यस्थ/ठग/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
4. निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे सर्वाधिकार महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे राहतील.
5. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
6. सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
7. मागासवर्ग आरक्षणांतर्गत अग्निशामक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्याकडे जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास संबंधित जात पडताळणी समितीकडे जातीचा दावा तपासणीकरिता सादर करण्यासाठी शासन निर्णयानुसार आवश्यक असलेला अर्ज, प्रतिज्ञापत्र व त्यासोबत संबंधित कागदपत्रे दयावी लागतील.

8. उमेदवाराने भरती प्रक्रीया संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत महानगरपालिकेचे संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे.
9. मुंबई अग्निशमन दल हे अत्यावश्यक खाते असल्यामुळे भरती प्रक्रीयेदरम्यान बृहन्मुंबई शहरामध्ये जर एखादी आपत्कालीन दुर्घटना घडल्यास भरती प्रक्रीयेच्या कार्यक्रमात बदल करण्यात येईल.
10. उमेदवारांनी त्यांचे मूळ कागदपत्र व्यवस्थित ठेवणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रे हरवल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.
**11. खुला/अराखीव प्रवर्ग- रु. 944/- आणि मागासवर्गीय व आदुघ/अनाथ आरक्षण अंतर्गत अर्ज करणारे उमेदवार -रु.590/- इतके भरती प्रक्रीया शुल्क (वस्तू व सेवा कर सहीत) 'बृहन्मुंबई महानगरपालिका'** (Brihanmumbai Municipal Corporation) **या नावाने मुंबईत देय असलेला** (Payable at Mumbai) **डिमांड ड्राफ्ट भरतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.**
12. डिमांड ड्राफ्ट नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही व सदर उमेदवारास भरती प्रक्रीयेत समाविष्ट केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
प्रमुख अग्निशमन अधिकारी
मुंबई अग्निशमन दल

बृहन्मुंबई महानगरपालिका
वैयक्तिक माहितीपत्र (BIO DATA)
अग्निशामक पदाकरिता

| |
|---|
| उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वत:ची स्वाक्षरी करावी. 2.5सें.मी.X3 सें.मी. |

1. अ) संपूर्ण नाव (मराठीत) :

आडनाव:

नांव:

वडिलांचे / पतीचे नांव :

ब)वडिलांचे /पतीचे संपूर्ण नाव : श्री.------------------------------------------------------------

क)विवाहीत महिलांच्या बाबतीत त्यांचे विवाहापूर्वीचे संपूर्ण नांव (------------------------------------------)

ड) विवाह नोंदणी प्रमाणपत्र -

2. अ) पत्ता (पिन कोड सहित)-

ब) दूरध्वनी क्रमांक –

भ्रमणधनी (मोबाईल)क्रमांक-

क)ई मेल आय डी -

3. लिंग - महिला / पुरुष

4. अ) उमेदवार सामाजिक आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छितो किंवा नाही. होय/नाही होय असल्यास

ब) प्रवर्ग - जात- पोटजात-

क)जात वैधता प्रमाणपत्र- आहे/नाही.

ड) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम (चालू आर्थिक वर्षाचे) प्रमाणपत्र- आहे/नाही

इ)समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी (√) असे चिन्ह करा

| माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला |
|---|---|---|---|---|
| | | | | |

ई)स्त्री उमेदवार महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिते का ? होय/नाही

उ)उमेदवार अनाथ आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छितो का ? होय/नाही

5. अ)जन्म दिनांक :- दिनांक महिना वर्ष

| दिनांक | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब)दि.31/12/ 2022 रोजी वय - वर्षे -------- महिने ------- दिवस--------

6. अ)शैक्षणिक अर्हता

| शैक्षणिक अर्हता | प्राप्त झालेले गुण | |
|---|---|---|
| | एकूण / पैकी | मराठी एकूण/पैकी |
| एस.एस.सी. | | |
| एच.एस.सी. | | |

ब)संगणक विषयक ज्ञान – एम.एस.सी.आय.टी.किंवा होय/नाही
शासनाने विहित केलेला संगणक विषयक अभ्यासक्रम

7. शारिरीक पात्रता : उंची : ------ सें.मी. वजन : ---------कि.ग्रॅम

छाती- फक्त पुरुष उमेदवारांसाठी- साधारण------ से.मी. फुगवून- ---------से.मी.

वर्ण:------------- नेत्र / वर्ण:------------- वैयक्तिक खूण : ------

8. अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? ----------------होय/नाही--------------------

ब)शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद ------------------------------------------
करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची ------------------------------------------
प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. ---------------------------------------- ---

9. अ)उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन ----------------होय/नाही--------------------
प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ?

ब)असल्यास त्याबाबतचा तपशील दयावा. ------------------------------------------

10. अ)सध्या अर्जदार इतरत्र नोकरीत आहे का ? ----------------होय/नाही--------------------

ब)असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन ------------------------------------------

सध्याच्या नियोक्त्याचे 'ना हरकत' प्रमाणपत्र जोडावे ------------------------------------------

11. अ)स्वातंत्र्यसैनिक किंवा स्वातंत्र्यसैनिकांचा नामनिर्देशित

वारस आहे का ? ----------------होय/नाही--------------------

असल्यास त्याबाबतचा तपशील दयावा. ------------------------------------------

ब)राष्ट्रीय/राज्य/जिल्हा स्तरावरील खेळाडू आहे काय ? ----------------होय/नाही--------------------

असल्यास त्याबाबतचा तपशील दयावा.

क)एन.सी.सी.चे प्रमाणपत्र/त्याबाबतचा तपशील दयावा. ----------------होय/नाही--------------------

ड) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर व
राज्य शासनाचे महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी व ----------------होय/नाही--------------------
राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांच्या कडील
अग्निशामक,दुय्यम अधिकारी व तत्सम मान्यताप्राप्त अभ्यासक्रम
पूर्ण केलेला आहे काय ?/नागरी सेवा दलाचा अग्निशमन अभ्यासक्रम
पूर्ण केलेला आहे काय ? असल्यास त्याबाबतचा तपशील दयावा.

इ)हलके /जड वाहनचालक परवाना आहे काय ? त्याबाबतचा तपशील दयावा. ------------होय/नाही----------

फ)होमगार्डमध्ये कमीत कमी 3 वर्षे सेवा केल्याचे प्रमाणपत्र/ -----------------------------------------

असल्यास त्याबाबतचा तपशील दयावा.

ग)समुद्रकिना-यावर जीवरक्षक असल्याचे पत्र ----------------होय/नाही------------

12. **सदर पदासाठी अर्ज करणा-या सर्व उमदेवारांनी खुला/अराखीव प्रवर्ग- रु. 944/- आणि मागासवर्गीय व आदुघ/अनाथ आरक्षण अंतर्गत अर्ज करणारे उमेदवार -रु.590/- इतके भरती प्रक्रीया शुल्क (वस्तू व सेवा कर सहीत) 'बृहन्मुंबई महानगरपालिका'** (Brihanmumbai Municipal Corporation) **या नावाने मुंबईत देय असलेला** (Payable at Mumbai) **डिमांड ड्राफ्ट भरतीच्या वेळेस अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.**

| **डिमांड ड्राफ्ट काढलेल्या बँकेचे नांव** | **डिमांड ड्राफ्ट काढलेला दिनांक** | **डिमांड ड्राफ्ट क्रमांक** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| | | | |

**डिमांड ड्राफ्ट च्या मागे उमेदवाराने त्यांचे पूर्ण नांव व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.**

मी, यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो /करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहाणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

स्थळ - अर्जदाराची सही /-

दिनांक : (अर्जदाराचे नांव)

उमेदवारांनी अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रत जोडाव्यात.

1. शैक्षणिक अर्हता (10/12 वी गुणपत्रक व प्रमाणपत्र, इयत्ता 12 वी प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र)
2. जात व जातवैधता प्रमाणपत्र,
3. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम (चालू आर्थिक वर्षाचे) प्रमाणपत्र.
4. अधिवास प्रमाणपत्र.
5. महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र.
6. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र.
7. समांतर व अनाथ आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांबाबत सक्षम अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र.
8. राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर व राज्य शासनाचे महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी व राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांच्या कडील अग्निशामक, दुय्यम अधिकारी व तत्सम मान्यताप्राप्त अभ्यासक्रम प्रमाणपत्र/नागरी सेवा दलाच्या अग्निशमन अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र
9. एन.सी.सी./एमसीसीचे प्रमाणपत्र.
10. हलके/ जड वाहनचालक वैध परवाना.
11. होमगार्ड कमीत कमी 3 वर्ष सेवा केल्याचे प्रमाणपत्र.
12. समुद्रकिना-यावर जीवरक्षक असल्याचे पत्र.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र)नियम , 2005 नुसार**

**अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना – अ**

**(नियम 4 पहा)**

मी श्री./श्रीम./कुमारी-------------------------------------------------------------------------------------

श्री.-----------------------------------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय----------वर्षे,

राहणार,-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------

याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

1. मी -------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
2. आज रोजी मला -------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.28 मार्च, 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------------आहे.
3. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 व तदंनतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण –

दिनांक - उमेदवाराची स्वाक्षरी